स्थायी समिती
दाखल विषय – दि. २२/५/२०१८

**विषय क्रमांक :– १६२ त्वर्य**

प्रभाग क्र. ३१ क स.नं. १३० पेट्रोलपंप कॅनॉल रस्ता येथे ओढयावरील पुलाची रुंदी वाढविणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.स्वामीराज एन्टरप्रायजेस यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.३९,९६,९३२=२८ पेक्षा १७.६०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३२,९३,४७२=२० अधिक निविदा शर्तीप्रमाणे भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार येणारी रक्कम कमी/अधिक करणेस तसेच त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/७२ दि.१९/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १६३ त्वर्य**

प्रभाग क्र. २२ अ मध्ये विठ्ठल तुपे (पाटील) क्रिडासंकुलाचे उर्वरित कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.धनज्योती इंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,८९,९०२=४० पेक्षा २०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३९,९१,९२१=९२ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/७३ दि. १९/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १६४ त्वर्य**

वानवडी रामटेकडी कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रभागातील पडीक हद्दीतील स्वच्छतेसाठी बिट्स नुसार झाडण कामे करणे भाग ४ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.यु.आर.फॅसिलिटी सर्व्हिसेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९९,९९९=१० पेक्षा ४.९९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,०४,९८,९९९=०५ त्यानुसार खात्याकडील उपलब्ध तरतुद र.रुपये ९९,९९,९९९=१० पर्यंतच माहे १ एप्रिल २०१८ पासून काम करून घेणेस व त्यांच्याशी त्याप्रमाणे करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि–४/७५ दि. १९/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १६५ त्वर्य**

पुणे पेठ सदाशिव विश्रामबागवाडा या ऐतिहासिक वास्तुमधील शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे हे पेठ शनिवार पुणे म.न.पा. न.वि.गाडगीळ शाळेच्या इमारतीमध्ये ३० वर्षाकरीता स्थलांतरीत करणेकरीता दरमहा मासिक भाडे र.रुपये ६३,७८९/- (अक्षरी रुपये त्रेसष्ट हजार सातशे एकोणनव्वद फक्त) व (दर ३ वर्षांनी १२% भाडेवाढ करुन) आकारुन देणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/७६ दि. १९/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १६६ त्वर्य**

प्रभाग क्र. ८ बोपोडी येथे योगा हॉल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार सलिम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५३,८४,५०५/– पेक्षा ६.११% कमी) (सुधारीत दर) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५०,५५,५११=७४ अधिक टेंडर अटी शर्ती मधील भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/७९ दि. २२/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १६७ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या विविध रूग्णालयांमध्ये Microwave Based Medical Wast Disinfection Machine / System खरेदी करणे.( टेंडर क्रमांक ७३ सन २०१७-१८ ) कामी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण तीन निविदा आल्या असून सर्वात कमी दर देणारे निविदाधारक ए.जी.सेल्स यांचेकडून पुणे महानगरपालिकेच्या विविध रूग्णालयांमध्ये Microwave Based Medical Waste Disinfection Machine / System Capacity 30 Ltr. क्षमतेचे जीएसटी करासहित एक नग रक्कम रूपये २९,९७,२००-/ आणि Microwave Based Medical Waste Disinfection Machine / System Capacity 60 Ltr. क्षमतेचे जीएसटी करासहित एक नग रक्कम रूपये ४०,००,२००/- असे एकुण २ नगांची

रक्कम रूपये ६९,९७,४००/- ( अक्षरी रक्कम रूपये एकोणसत्तर लाख सत्यानव हजार चारशे फक्त ) पर्यंत खरेदी करणेस व त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस आणि खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/८० दि.२२/५/२०१८ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०१८-२०१९

RE 31 F / R-5 167

महापौर विकास निधी

मान्य तरतूद रक्कम रूपये १०,००,००,०००/- पैकी ६९,९७,४००/-

**विषय क्रमांक :- १६८ त्वर्य**

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर व मा.हिमाली कांबळे यांचे दि.१८/५/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या विद्युत विभागाच्या चालू वर्षाच्या (सन २०१८-१९) विभागीय दरपत्रकामध्ये (डी.एस.आर.) सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक असलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेरा यंत्रणेचा समावेश केलेला दिसत नाही. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सदर यंत्रणा त्वरित उभारणे गरजेचे आहे. सदर यंत्रणेसाठी आमच्या प्रभागात चालू वर्षाच्या (सन २०१८-१९) अंदाजपत्रकात तरतूद उपलब्ध असून ( बजेट कोड- CE20C352/SB5-1217 ) त्यासाठी तातडीने निविदा प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे.

सी.सी.टी.व्ही. कॅमेरा यंत्रणा हि आमच्या प्रभागात गेल्या ३ वर्षात विविध ठिकाणी टप्प्याटप्प्यात उभारण्यात आलेली असून त्याचा कंट्रोल हा जवळील पोलीस चौकीला जोडण्यात आलेला आहे. त्यायोगे पोलीस प्रशासनाला अनेक गुन्हेगारी घटनांना आळा घालण्यात मदत होते आहे. तसेच सदर यंत्रणा हि विना अडचण वर्षानुवर्ष योग्य काम करीत असून याच यंत्रणेला चालू वर्षी नवीन वाढीव भागातील सी.सी.टी.व्ही. कॅमेरे जोडणे गरजेचे असल्या कारणाने गेल्या वर्षातील विभागीय दरपत्रकातीलच आयटेम व मेक तातडीने समविष्ट करणे सुसंगत होते. तसेच राज्य शासनाद्वारे उभारण्यात आलेली सी.सी.टी.व्ही. कॅमेरा यंत्रणा हि केवळ मुख्य रस्त्यांवरच असल्या कारणाने इतर संवेदनशील ठिकाणाकरिता पुणे महानगरपालिकेमार्फत सी.सी.टी.व्ही. कॅमेरा यंत्रणा उभारणे गरजेचे आहे.

गेल्या वर्षातील विभागीय दरपत्रकातील आयटेम, दर व मेक बघितल्यास मा.अति.महापालिका आयुक्त यांच्या ठराव क्र.१०/६९८ दि.२७/१२/२०१६ नुसार मान्य करण्यात आलेले असून सदर स्पेसिफिकेशन हे उच्च प्रतीचे आहेत. तसेच केंद्रशासनाच्या GeM 3.0 पोर्टल वर सुद्धा उपलब्ध आहेत. सी.सी.टी.व्ही. पुरविणे व बसविणे काम हे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून महत्वाचे असल्या कारणाने केवळ स्वस्त किंमतीकरिता सुरक्षिततेच्या बाबतीत तडजोड करणे योग्य नसल्याने अत्याधुनिक, योग्य व उच्च प्रतीचे कॅमेरे घेणे महानगरपालिकेच्या तसेच नागरिकांच्या हिताचे ठरते. तसेच सदर कामात केवळ पुरवठा करणे अपेक्षित नसून वारंवार लागणारी पश्चात सेवा पुरविणे हे संवेदनशील कारणास्तव अत्यावश्यक आहे. अनेकदा पोलीस अथवा प्रशासकीय यंत्रणांना वारंवार तातडीने शोधकार्यास्तव सी.सी.टी.व्ही.फुटेज ची आवश्यकता लागते. त्याचप्रमाणे भारतीय राजपत्र सं.२२७ द्वारे दूरसंचार विभागाच्या अधिसूचनेनुसार सरकारी/ निमसरकारी खात्याच्या स्वतःसाठी वापर करण्यात येणाऱ्या इलेक्ट्रोनिक उत्पादनांमध्ये स्वदेशी कंपन्यांना प्राधान्य देण्याचे नमूद करण्यात आलेले आहे. त्यानुसार पान क्र. ३ व १० अन्वये व्हिडीओ सर्वेलन्स सेक्युरिटी कॅमेरा यंत्रणेसाठी भारतीय मेकची खरेदी करणे आवश्यक आहे त्यानुसार भारतीय मेक सुद्धा समाविष्ट केलेले दिसत आहे.

तसेच पुणे महानगरपालीकेमार्फत यापूर्वी योग्य नियोजनाअभावी लावण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेरा यंत्रणेमुळे पालिकेचे तसेच नागरिकांचे मोठे नुकसान झालेले दिसते आहे. त्याच्या उदाहरणादाखल खालील २ दाखले सादर करता येतील:

१) पुणे महानगरपालिकेमार्फत विविध सिग्नलवर उभारण्यात आलेली ITS CCTV यंत्रणेवर सुमारे रक्कम रुपये ५० लक्ष खर्च करण्यात आलेला असतांना जंगली महाराज बॉम्बस्फोट तसेच मा.दाभोलकर हत्या प्रकरणात या यंत्रणेचा काहीही उपयोग झाला नाही कारण ती यंत्रणा हि पूर्णपणे बंद होती तसेच उभारल्यापासून आजतागायत सदर यंत्रणा बंद असून सर्व पैसे पाण्यात गेल्याचे दिसत आहे.

२) सन २०१२ व २०१३ साली विद्युत विभागाच्या निविदा क्र. १९०-२०११, १३८-२०१२ द्वारे DPDC मार्फत उपलब्ध तरतूद रक्कम रुपये १.२० कोटी खर्च करण्यात आलेला असतांना लावल्या दिवसापासून सदर यंत्रणा हि कार्यरत नसल्याचे दिसत आहे. सदर यंत्रणेचा मेंटेनन्स कालावधी हा ४ वर्षांचा असूनही एप्रिल २०१५ साली निविदा क्र.१-२०१५ अन्वये सुधारणे साठी परत रक्कम रुपये १० लक्ष खर्चाची निविदा मागविण्यात आली. एवढे करूनही आजहि सदर यंत्रणा बंद पडली असून सर्व पैसे पाण्यात गेल्याचे दिसत आहे.

वरील उदाहरणांची तुलना केल्यास आमच्या प्रभागातील यंत्रणा हि मेंटेनन्स कालावधी हा १ वर्षांचा असूनही आजतागायत उत्कृष्टरित्या कार्यरत आहे. असे असतांना पुणे महानगरपालिकेच्या विद्युत विभागाच्या चालू वर्षाच्या (सन २०१८-१९) विभागीय दरपत्रकामध्ये (डी.एस.आर.) सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक असलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेरा यंत्रणेचा समावेश केलेला दिसत नाही. त्यायोगे कुठलाही नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न उद्भवल्यास जबाबदार असल्याची विद्युत विभागाने लेखी हमी देणे गरजेचे आहे. तसेच वरीलप्रमाणे उदाहरणादाखल नागरिकांचा कररुपी पैश्यांचा अपव्यय करून नागरिकांच्या सुरक्षेशी खेळ करण्याऐवजी गेल्या ३ वर्षातील गुणवत्ता सिद्ध झालेले विभागीय दरपत्रकातील आयटेम, दर व मेक तातडीने समविष्ट करण्यात यावेत. तसेच या यंत्रणेसाठीचे वार्षिक मेंटेनन्स साठीचे दर तातडीने समाविष्ट करण्यात यावेत. तसेच या क्षेत्रातील नवनवीन सोबत जोडल्याप्रमाणे सोलर कॅमेऱ्यांसारख्या अत्याधुनिक उत्पादनांचाही समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– १६९ त्वर्य**

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहा पौर व मा.हिमाली कांबळे यांचे दि.१८/५/२०१८ चे पत्र.

पुणे शहर हे अतिशय वेगाने वाढणारे शहर आहे. या शहराची लोकसंख्या जवळजवळ ४० लाखापर्यंत आहे. या शहरामध्ये ४२ टक्के नागरीक झोपडपट्टीमध्ये राहणारे आहेत. तसेच अनेक नागरीक जुन्या वाडंयामध्ये, चाळींमध्ये व छोटया घरामध्ये वास्तव्यास आहेत. आर्थिक व सामाजिक सर्व्हेक्षण नुसार पुणे शहरामध्ये ७० टक्के पेक्षा जास्त नागरीकांना आरोग्याची सुविधा चांगल्या दर्जाची मिळत नाही.

पुणे महानगरपालिकेच्या वतीने पुणे शहरातील नागरीकांना चांगली आरोग्य सेवा देण्याचे पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनाची जबाबदारी आहे. आरोग्य विभागातर्फे सुविधा देण्यातील त्रुटी लक्षात घेता प्रामुख्याने तज्ञ डॉक्टर विविध विभागाचे यांची कमतरता असल्याने आपल्याला ही सुविधा देणे अडचणीचे होत आहे. म्हणून मागील वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये व यंदाच्याही अंदाजपत्रकामध्ये पुणे महानगरपालिकेतर्फे मेडीकल कॉलेज काढण्याकरीता आर्थिक तरतुद उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्या कामाचे सर्व्हेक्षण व अहवाल तयार करण्यासाठी कन्स्ल्टंट नेमण्यात आले आहे. हे काम झाल्यानंतर मेडिकल कॉलेजसाठी काही कालावधी लागणार आहे.

तरी तोपर्यंत पुणे महानगरपालिकेमधील रूग्णालयांमध्ये तज्ञ डॉक्टरांसाठी ससून रूग्णालय व बी.जे. वैद्यकिय महाविद्यालय समवेत सामंजस्य करार करून **पदव्युत्तर डॉक्टर कोर्सेस** चालू करावेत. जेणेकरून पुणे महानगरपालिकेच्या रूग्णालयांमध्ये तज्ञ डॉक्टर उपलब्ध होवू शकतील. याचा प्रस्ताव प्रशासनामार्फत करणेत येवून तो प्रस्ताव राज्य शासनाच्या आरोग्य विभाग व शिक्षण विभागाकडे अभिप्रायासाठी पाठवावा.

**विषय क्रमांक :– १७० त्वर्य**

मा.सुनिल कांबळे व मा.सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि. २२/५/२०१८ चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. २८ दि. १०/४/२०१८ चा फेरविचार करुन श्री.शंकर भिमराव अडागळे, सेवानिवृत्त मुकादम यांच्याबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र. २७५३ दि.२५/२/२०११ अन्वये करण्यात आलेला ठराव कायम करण्यात यावा व तसे अभिवेदन मे.शासनास कळविण्यात यावे.

**विषय क्रमांक :– १७१ त्वर्य**

मा.सौ.मंजुषा नागपूरे, मा.दिलिप बराटे, मा.सौ.संगिता ठोसर, मा.सौ.वैशाली मराठे, मा.सौ.लक्ष्मी दुधाने, मा.सुनिल कांबळे, मा.मारुती तुपे, मा.सौ.कविता वैरागे, मा.दिलिप वेडेपाटील व मा.उमेश गायकवाड यांचे दि.२२/५/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिका अंदाजपत्रक सन २०१८-१९ मधील खालील नमूद केलेल्या विकास कामांमध्ये "मांडव/मंडप उभारणे" या ऐवजी "वारकऱ्यांसाठी तात्पुरत्या स्वरूपात निवारा केंद्र उभारणे" असा बदल करणेस मान्यता द्यावी.

| अ.क्र. | बजेट कोड | तपशील |
|---|---|---|
| १ | RE17F123 | पालखी, चतु:श्रुंगी यात्रा व गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक इ. |
| २ | | मांडव उभारणे (भवन) |
| ३ | | उत्सवानिमित्त (पालखी, जयंती, गणेशोत्सव इ.) मांडव उभारणे व तद्. कामे करणे |
| ४ | RE22C301 | प्र.क्र.१ब उत्सव निमित्त (संत ज्ञानेश्वर महाराज पालखी, गणेशोत्सव इ.) मांडव उभारणे व तद्. कामे करणे |
| ५ | RE20C301/W4-357 | प्र.क्र. १७ येथे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज निवडुंग्या विठोबा मंदिर येथे पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध ठिकाणी मंडप व्यवस्था करणे |
| ६ | RE20C301/W4-358 | प्र.क्र. १७ येथे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांकरीता विविध ठिकाणी मंडप व इतर व्यवस्था करणे |
| ७ | RE20C301/W4-359 | प्र.क्र.१७ मध्ये कामगार मैदान, डोके तालिम मित्र मंडळ, किराड हौद, स्वामी समर्थ मठ परिसरात पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध ठिकाणी मांडव व्यवस्था करणे |
| ८ | RE20C301/W1-362 | प्र.क्र. १८ मध्ये पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध ठिकाणी मांडव व्यवस्था करणे |
| ९ | RE20C301/W1-363 | प्र.क्र. १८ मध्ये बलवार आळी, २५१ गुरूवार पेठ, म.फुले वाडा परीसर, १२२ भवानी पेठ बँक ऑफ महाराष्ट्र, श्रमदान चौक, मंगल क्लब गणपती मंदिर याठीकाणी पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध ठिकाणी मांडव व्यवस्था करणे |
| १० | RE20C301/W1-368 | प्र.क्र. १९ मध्ये पालखी सोहळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध ठिकाणी मांडव व्यवस्था करणे |
| ११ | RE20C301/W1-369 | प्र.क्र. १९ मध्ये पेस्तानजी दवाखाना, अण्णाभाऊ साठे वसाहत, लक्ष्मी बाझार, देना बँक रुपी बँक, बापूसाहेब पवार कन्या शाळा, घोडके मटण मार्केट याठीकाणी पालखी सोहळ्यासाठी |

| | | |
|---|---|---|
| | | येणाऱ्या वारकऱ्यांसाठी विविध ठिकाणी मांडव व्यवस्था करणे |
| १२ | CE 22A 548/SJ10-1237 | प्र.क्र.१७ ब मधील संत श्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळयासाठी नाना पेठ यथे मंडपविषयक कामे करणे |
| १३ | CE 22A 548/SJ10-1241 | प्रभाग क्र.१९ अ मधील काशेवाडी, हरकानगर, लोहियानगर, भवानी पेठ परिसरातील पालखीसाठी मंडप व्यवस्था करणे. |
| १४ | CE 22A 548/ SJ10-959 | प्रभाग क्र. १६ ब मधील विविध ठिकाणी श्री.संत ज्ञानेश्वर महाराज व श्री.संत तुकाराम महाराज पालखी मधील वारक–यांसाठी मांडव टाकणे व लाईट व्यवस्था करणे |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**